# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.09.2024** **वारःशुक्रवार**

---

1. भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात उल्लेखनीय परिवर्तन होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन,
2. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्व द्यायला अमेरिकेचा पाठिंबा
3. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेसंदर्भातील वाद मिटवण्याच्या दृष्टीने अधिक वेगाने प्रयत्न करण्याबाबत भारत आणि चीनमध्ये सहमती आणि
4. दक्षिण आशियाई  कनिष्ठ गट ॲथलॅटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाला 9 सुवर्ण पदकं

**<u>मोदी</u>**

भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात उल्लेखनीय परिवर्तन होत असून यामुळं नागरिकांसाठी प्रवास सुलभ होत आहे, तसंच दळणवळणाला चालना मिळत आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल संध्याकाळी नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं आयोजित नागरी हवाई वाहतूकविषयक दुसऱ्या आशिया प्रशांत मंत्रिस्तरीय परिषदेला संबोधित करताना बोलत होते. सर्व सदस्य देशांनी दिल्ली घोषणापत्र स्वीकारल्याची घोषणा पंतप्रधानांनी केली. दिल्ली घोषणापत्र हा प्रदेशाच्या विमान वाहतूक क्षेत्राला नवीन उंचीवर नेण्यासाठी तयार केलेला एक दूरदर्शी आराखडा आहे. नागरी विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांची या मंत्रिस्तरीय परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यावेळी उपस्थित होते.

**<u>अमेरिका</u>**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्व द्यायला तसच याबाबतीत प्रस्तावात संशोधन आणि सुधारणा करायला अमेरिकेने आपला पाठिंबा दर्शवला आहे. संयुक्त राष्ट्र परिषदेतील अमेरिकेच्या स्थायी प्रतिनिधी लिंडा थोमस ग्रीन फील्ड यांनी याबाबत सांगितल की संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत मतदानासाठी प्रस्ताव तयार करायला अमेरिकेचा पाठिंबा आहे. भारत, जपान आणि जर्मनी या देशांना सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्व मिळाव म्हणून अमेरिका प्रयत्नशील आहे. मात्र काही देशांचा या नवीन संशोधन प्रस्तावाला विरोध आहे.

**<u>अजित डोवाल</u>**

रशियातील सेंट पिटर्स बर्ग इथ सुरू असलेल्या  ब्रिक्स  देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बैठकीच्या पार्श्वभूमीवर, काल भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी रशियाचे राष्ट्रपती ब्लादी मीर पुतीन यांची भेट घेतली. याबाबत रशियाच्या भारतातील दूतावसाने एक निवेदन प्रसिद्ध केल असून त्याबाबत माहिती दिली आहे. या भेटीत पुतीन यांनी भारत आणि रशिया दरम्यान विशेष धोरणात्मक भागीदारीची प्रशंसा केली आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्याच्या दृष्टीने  सुरक्षेच्या मुद्द्यावर जास्त भर देण्याची इच्छा व्यक्त केली. येत्या 22 ऑक्टोबरला कझान इथ होणाऱ्या ब्रिक्स देशांच्या संमेलना वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बरोबर द्विपक्षीय संबंध सुधारण्याबाबत भेट ठरवण्याचा प्रस्ताव ही पुतीन यांनी यावेळी मांडला.

दरम्यान, भारत आणि चीन दरम्यान प्रत्यक्ष नियंत्रण सीमेसंदर्भातील वाद मिट वण्याच्या दृष्टीने जास्त वेगाने प्रयत्न करण्याबाबत सहमती झाली. रशियातील सेंट पिटर्सबर्ग इथ सुरू असलेल्या ब्रिक्स देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बैठकीच्या पार्श्वभूमीवर, काल भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनचे केंद्रीय परराष्ट्र आयोगाचे सचिव वांग इ यांच्यात

याबाबत एक स्वतंत्र बैठक झाली. यावेळी भारत चीन दरम्यान प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आणि सीमेबाबत तयार करण्यात कराराच्या अटींच पालन करण अत्यावश्यक असून, यामुळे दोन्ही देशांचे द्विपक्षीय संबंध सुधारण्यास तसच या क्षेत्रात शांती राखण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल अस मत यावेळी दोन्ही नेत्यांनी व्यक्त केल.

**ट्रम्प हॅरिस वाद**

अमेरिकेच्या उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांच्याविरुद्ध आणखी अध्यक्षीय वादविवादांमध्ये सहभागी होणार नसल्याचं अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलं. ट्रुथ सोशल पोस्टमध्ये, ट्रम्प यांनी फिलाडेल्फियामध्ये झालेल्या सुरुवातीच्या चर्चेत विजयाचा दावा केला असून, हॅरिस मोठ्या वृत्तवाहिन्यांची आमंत्रणं टाळत असल्याचा आरोप केला. दरम्यान, कमला हॅरिस यांनी ट्रम्प यांना अधिक वादविवाद सुरू ठेवण्याचं आवाहन केलं असून, ते मतदारांसाठी महत्त्वाचं असल्याचं म्हटलं आहे.

**रशिया चीन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रशिया दौऱ्यापासून 35 भारतीय नागरिकांची रशियन सैन्यातून सुटका करण्यात आली असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. यामुळे सुटका झालेल्या भारतीयांची एकूण संख्या 45 वर पोहोचली आहे. पंतप्रधानांच्या भेटीपूर्वी 10 भारतीय नागरिकांना सोडण्यात आलं होतं. अद्याप रशियन सैन्यात आणखी 50 भारतीय नागरिक असून आणि त्यांची लवकरात लवकर सुटका करण्यासाठी तातडीचे प्रयत्न सुरू असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**विसर्जन**

महाराष्ट्रात घरोघरी विराजमान झालेल्या गणपतीबाप्पांचं आणि माहेरवाशिणी गौरीचं  काल भावपूर्ण वातावरणात आणि 'पुढच्या वर्षी लवकर या' असा आग्रह धरत विसर्जन करण्यात आलं.

ऑस्ट्रेलियातल्या मेलबर्नमध्येही गेल्या 4-5 दशकांपासून गणेशोत्सव साजरा केला जातो. या विषयीची माहिती आकाशवाणीच्या श्रोत्यांना देताना अनुपमा कट्यारे यांनी सांगितलं...

**ज्येष्ठ नागरिक**

केंद्र सरकारने 70 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य विमा देण्याच जाहीर केल असून त्यासाठी पात्र ज्येष्ठ नागरिकांना एक विशेष आयुष्मान कार्ड देण्यात येणार आहे. याबाबत सरकार तर्फे काल एक अधिसूचना जाहीर केली असून, एका आठवड्यात ही योजना कार्यान्वित होणार आहे. ज्येष्ठांना  आधार कार्ड आधारित हे कार्ड देण्यात येणार असून त्यासाठी  आयुष्मान पोर्टल वर पात्र नागरिकांनी अर्ज करायचा आहे. या पोर्टलवर चेहरा ओळख नोंदणीही करता येणार आहे. 70 वर्षावरील कोणत्याही आर्थिक स्तरातील तसच खाजगी कंपन्यांचा आरोग्य विमा असलेले आणि राज्य आणि केंद्रसरकरच्या सेवेतील कर्मचाऱ्यासाठी आरोग्य विमा सुविधा उपलब्ध असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सुद्धा या आयुष्मान आरोग्य विम्याचा लाभ घेता येणार आहे. या पंतप्रधान आयुष्मान आरोग्य विमा योजनेसाठी केंद्रीय मंत्रीमंडळाने 3 हजार 437 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता दिली असून त्याचा देशातील सुमारे साडेचार कोटी कुटुंबे आणि 6 कोटी ज्येष्ठ नागरिकांना लाभ होणार आहे.

**डायमंड लीग फायनल**

ब्रुसेल्स इथं आजपासून सुरू होणाऱ्या डायमंड लीगच्या अंतिम फेरीत भारताचं प्रतिनिधित्व पॅरिस ऑलिम्पिकमधील रौप्यपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि स्टीपलचेस धावपटू अविनाश साबळे करणार आहेत. यंदा डायमंड लीगमधील अलियान्झ मेमोरियल व्हॅन डॅमे स्पर्धेत हे क्रिडापटू विजयासाठी लढत देतील. सध्या 14व्या क्रमांकावर असलेला भारताचा स्टीपलचेसर अविनाश साबळे आज डायमंड लीगच्या अंतिम फेरीत पदार्पण करेल. त्याचा सामना इथिओपियाचे सॅम्युअल फायरवू, गेटनेट वले, केनियाचे आमोस सेरेम आणि अब्राहम किबिवोट यांच्याशी होईल, तर सध्या 14 गुणांसह क्रमवारीत चौथ्या स्थानावर

असलेला नीरज चोप्राचा समाना उद्या पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेता ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स आणि जर्मनीचा ज्युलियन वेबर यांच्याशी होईल.

**स्पर्धा**

चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा पुण्यात सुरू आहे. काल झालेल्या सामन्यात गतविजेते पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड, गतवर्षीचे उपविजेते रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड, फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि सरस गुणांच्या जोरावर सेवा क्रीडा नियामक मंडळाच्या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**स्पर्धा**

चेन्नई इथ सुरू असलेल्या दक्षिण आशियाई कनिष्ठ गट ॲथलॅटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत कालच्या दुसऱ्या दिवशी भारतीय संघाने शानदार प्रदर्शन करत 9 सुवर्ण पदक पटकावली. भारताच्या अनिशाने थाळी फेक प्रकारात कल पहिल सुवर्ण पदक जिंकल तर महिलांच्या 400 मीटर धावण्याच्या स्पर्धेत निरू पाठक ने सुवर्ण पदक मिळवल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार